## वेध गीत २००९

माझी खिडकी, माझे दार,
माझे अंगण, माझाच् पार
माझे, माझे, माझे म्हणता
धाप लागून गेली यार ।।धृ।।

गोळा केला सारा भार
मीच झालो राखणदार
हमला केला कधी कुणी
तर देईन त्यांना जबरी मार ।। १।।

नजरेत घुसला, संशय फार
रागाला भीतीचा खार
मैत्री हटली, प्रेम आटले
आपुलकी तर केव्हाच ठार ।। २।।

माझ्या, माझ्या बेटाभोवती
एकाकीपण जमले फार
सगळे, सगळे पूल तोडले
तलवारींना लावून धार
माझे, माझे, माझे म्हणता
वाट लागून गेली यार ।।३।।
वाट लागून गेली यार
............(चालीमध्ये बदल होतो)
भिडू निराळे, संघ एक तरी
फुले वेगळी, एकच हार,
एक दिलाने काम करु तर
न ही जीत अन् नाही हार ।। ४।।

एकच माती, एकच देश
एक भावना, अनेक वेश
आपण सारे, मिळून यारे
नव्या दिशेचे उघडू दार ।।५।।

## वेध गीत २००८

## मी रोज स्वत:शी गावे

श्वासात मिसळुनी द्यावे
हे सूर नव्या हिमतीचे . . .
. . .are my friends
ITS IN ME, THE SONG OF LIFE

जलद जगाशी जुळवित अपुली
जगण्याची लय सारे
शोधून काढू अंतरातली
अवघी मिटली दारे
ध्यास स्वत:च्या उत्कर्षाचा
डोळस करता करता
मागे पडल्या, विसरवाटेच्या
भावांना उरि धरता
प्रगतीच्या या प्रवासातही
ह्रदयी अमृत ठेवू
वाटेवरती स्वच्छंदपणे
प्रेमच उधळत जाऊ

या उर्जेचा हा उत्सव
घेऊन पहा हर अनुभव
हारजीत शिकवते आम्हा . . .
. . .How to thrive
ITS IN ME, THE SONG OF LIFE . . .

## गीत - २००६

## नील गगन, हरीत धरा

नील गगन, हरीत धरा, शुभ्रतेत न्हात झरा
हिमशिखरी किरणांचा, लालकेशरी ग तुरा
चित्र मिळून सारे, रोज रेखू या
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

केशरिया शक्ती देत, हिरवी ती निर्मिती,
समतेचा धवलरंग, चक्र असे नित्यगती
रंग जीवनाचे रंगून गाऊया
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

ध्वज माझा स्फुर्तीदायी, ध्येयाप्रत नेई
कृष्णमेध जमले तरी धैर्य मला देई
प्रयत्न हेच रत्न, ओंजळीत ठेऊया
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

उन्नतीचे आत्मगीत गातसे तिरंगा
भक्तीनेच ईशरुप, येतसे अभंगा
विश्वास उजळणारा, विश्वास देऊया
प्रगल्भ भारताचे निशाण होऊया.

(वेध - २००० : गीत)

## नव्या शतकाचे गाणे

**नव्या शतकाचे गाणे,**
**गाऊया हो सारे**
**मनाच्या आभाळी,**
**चमकती स्वप्नतारे ।।धृ।।**

**इच्छेचे मखर,**
**त्यात श्रमाचे झुंबर ।**
**प्रयत्नांचा ताल,**
**त्याची लय हो सुंदर ।।**
**वाजतगाजत येई भविष्याची मुर्ती ।**
**बुध्दी हे मस्तक आणि ह्दयात स्फुर्ती ।।**

**हातामध्ये बळ आहे ज्ञानविज्ञानाचे ।।**
**मुकुटमण्याचे तेज संगणकाचे ।।**
**तीक्ष्ण चक्र हाती,**
**आणि कोवळे कमळ ।।**

**संकल्पाच्या धनुष्याला,**
**संयमाचे बळ**
**माझ्या ओठावर यावे,**
**समाधानी गीत ।**
**माझ्याबरोबर,**
**माझ्या देशाचेहि हित ।।**

## वेध गीत २००९

सूर्य तोच तो, धरा तीच ती
रोज नव्याने पहाट फुलते
स्थिर त्याच गगनात निळ्याही
नवरंगांची उधळण खुलते।। धृ।।

एक चिरंतन गती तरीही
रोज नवे आवर्तन घडते
एक झाड अन् तीच डहाळी
फुल सकाळी नवेच फुलते
काय नित्य अन् काय नूतन ते
सृष्टी आम्हा शिकवत असते
प्रयत्न लय ठेवा रे संतत
ज्ञानाचे मग मर्म उमगते ।।१।।

यशमानाचे मुकुटतुरे हे
दिनमानातच सुकुन जाती
सद्‌भावाच्या मऊ लकेरी
ह्रदयामध्ये मिसळून रहाती
कृती असू दे कालसारखी
तन्मयतेने नवीन होते
कंठ तोच अन् शब्द तेच ते
गाणे तरीही पुन्हा जन्मते. ।।२।।

(वेध गीत -२००५)

## कर्तव्याचे होई गाणे

कर्तव्याचे होई गाणे, तन्मयतेची तान।
परिश्रमाच्या वेलीवरचे यश सोनेरी पान।।धृ।।
अशी कल्पना मनात यावी, तिचाच व्हावा ध्यास
त्या ध्यासातून उमलत जाई, रोज नवा अभ्यास
अभ्यासातून उमगत जाई,
पूर्ण जगाचे भान ।।१।।

थकल्यावरही ध्येय ऊरीचे, रोज असावे जागे
पहाट होता, नव्या दमाने, मन मार्गाला लागे
मतीकृतीतील सरता अंतर,
योग साधतो छान।।२।।

पावलातली शक्ती माझ्या, ह्दयी उतरत जाई
मंत्र उद्याचा, हर श्वासाला, नवी उभारी देई
प्रवास झाला मधुर-निरामय,
उन्नत हो अभिमान।।३।।

कर्तृत्वाच्या शिखरावरही, नसती हेवे दावे,
यशातले आनंदज्ञान सर्वांचे होऊन जावे
नम्रतेतला सुगंध पसरे
हिरवे अवघे रान ।। ४।।

## वेध गीत - २०१२

टप्टप् थेंबे भरते घागर
लाटांनी हा सजतो सागर
एक बद्ध तर एक अथांग
नाते ह्यातील तू मज सांग।।धृ।।
असीम उर्जा म्हणजे सागर
देह भोवतो रचतो घागर
जन्ममृत्यूचे पालन-ताडन
कर्तृत्वाला मध्येच अंगण
एक घडा जरी दिसे लहान
अनेक मिळुनी होती महान।।१।।
बिंदु बिंदुने बनतो सिंधु
संघशक्तीचा सेतु बांधू
ध्येय हवे पण विशाल मोठे
तोडुनि हेवेदावे खोटे
जशी नदीला मीलनआंस
निष्ठा तशीच दृढ अन् खास।।२।।
ओघ घेतसे ही जलधारा
समुद्रतट हा एक निवारा
‘मी’ पण सारे संपून जाई
क्षितीजावर ज्ञानाचा तारा
स्वार्थाशी परमार्थ जुळवतो
सार्थक होतो तोच प्रवास।।३।।

## **वेध गीत २०११**

लेफ्ट-राइट, दाएँ-बाएँ, उजवा आणि डावा
ठॉक्-ठॉक् तालावरती रस्ता संपून जावा।।धृ।।

हातांची अन् पायांची ही एकसारखी गती
त्यामागे धावते विजेने विचार आणि मती
शरीरमनाचे मीलन बनते कर्तृत्वाचा दुवा।।१।।

हात दोन पायही दोन, तरीही एक ती चाल
ओठ दोन तरी वाणी एकच, एकच् लय अन् ताल
ओंजळीत संभाळून ठेवू स्वप्नांचा हा मेवा ।।२।।

उजवा मेंदू कल्पकतेचा, हिशोबी असे डावा
नियोजनाचे केंद्र एक तर दुसरा सृजन विसावा
दोहोंमधल्या संवादाचा अमोल आहे ठेवा ।।३।।

शिस्त उमलते आतून जेव्हा, नको नियम अन् शिक्षा
योग्य आखणी, योग्य मांडणी, ध्येयच देई दीक्षा
व्यक्तीसोबत देशच सारा, वाटे असा घडावा।।४।।
लेफ्ट-राइट, दाएँ-बाएँ, उजवा आणि डावा
ठॉक्-ठॉक् तालावरती रस्ता दोस्त व्हावा ।।

## **वेध गीत २०१३**

कसे जगावे आनंदाने, मंत्र मित्रहो हा ऐका

हेच पाहिजे, तेच पाहिजे, सोडा ‘च’चा तुम्ही हेका।।धृ।।

निर्धाराचा असे एक ‘च’, दुसरा असतो हट्टाचा

यत्न न सोडी म्हणतो पहिला, मार्ग असे हा सत्याचा

हट्टातुनी येतसे दुरावा, ‘मी-मी’ चा धरला ठेका

संवादाला नकार कायम, विरोध करणाऱ्या ठोका।।१।।

कृती करावी सुंदरनिर्मळ, मेळ बसे सहकार्याचा

गरज जाणुनि प्रत्येकाची मार्ग निघे उत्कर्षाचा

हट्टामध्ये एकाकीपण, आरोग्याला अति धोका

म्हणुनि सांगतो जागे व्हा अन् दुराग्रहला दूर फेका।।२।।

यशकिर्तीची झगमग झालर, किनार हो वा दुःखाची

निर्धारी ‘च’ समतोलाने, वाट काढतो ध्येयाची

फुशारकी अन् नैराश्याचा, दुसरा ‘च’ घेई झोका

जाणीवपूर्वक म्हणून तयाला, सतत विवेकाने टोका।।३।।

## ठाणे वेध २०१४

पावलोपावली रुतले काटे, तरी रस्त्याला कधी न सोडायचं
काळोखी नभात, अकेला तारा, त्याला पाहून पुढं रं
चलायचं।।धृ।।
मनात उमले, इवलासा कोंब, त्याला वादळापासून जपायचं
प्रेमाचं पाणी आणि कष्टाचं खत त्याला, नेमाने रोजचं
घालायचं।।१।।
एकाच्या हातात दुसऱ्याचा हात, घेऊन् उर्जेला एकत्र
जोडायचं
कामाच्या गतीत, घामाच्या थेंबात, नृत्याचं लावण्य
शोधायचं।।२।।
भरात आला आता स्वप्नाचा ध्यास, तर रातीला दिवस
करायचं
ताणाच्या क्षणाला, थकल्या तनाला, सर्वांना आपलं
म्हणायचं।।३।।
यशाच्या वेशीत गुढ्याकमानी, तरी बेडकीगत नाही रं
फुगायचं
नजरेपल्याड आहे अजून् आकाश, त्याला कवेत घेऊन
जगायचं।।४।।

## गीत गा रहे है आज हम

(वेध गीत २००१)

गीत गा रहे है आज हम,
रागिनी को ढूँढते हुए
आगए यहाँ जवा कदम,
जिंदगी को ढूँढते हुए।।धृ।।

ये दिलो मे ये उमंग हैं,
हम जहाँ नया बसाऐंगे
जिंदगी का दौर आज से,
दोस्तो को हम सिखाऐंगे
फूल हम नये खिलाऐंगे,
ताजगीको ढूँढते हूए।।

दहेज का बूरा रिवाज है,
आज देश मे, समाज में
है तबाह आज आदमी,
लूट पर टिके समाज में
हम समाज भी बनाऐंगे,
आदमी को ढूँढते हुऐ।।

फिर न रो सके कोई दुल्हन,
जोर जुल्म का न हो निशान,
मुस्कुरा उठे धरा गगन,
हम रचेंगें ऐसी दास्ताँ
हम वतन को यू सजाऐंगे,
हर खुशी को ढूँढते हुए।।

## पूरब की तरफ चल

(वेध १९९९: गीत)

पूरब की तरफ चल,
सूरज की तरफ चल।
हिंमत को साथ लिये,
सुख की तरफ चल।।

राह में कही-न-कही,
दर्द भी मिलेगा।
उसको बाँटने के लिये,
दोस्त भी मिलेगा।।

हँसने के लिये चल,
पढने केलिये चल।।
किस्मत को हाथ लिये,
कल की तरफ चल।।१।।

आनेवाले कल मे होगा,
खट्टा-मीठापन।
ज्ञान की प्रकाश में,
उठेगा खिल चमन।।

समता की तरफ चल,
ममता की तरफ चल।
शांती की आस लिये,
सब की तरफ चल।। २।।

## जोश, मस्ती अपने अंदर

(वेध गीत:२००२)

जोश, मस्ती अपने अंदर,
हम है वोही कलंदर
मेहनत जिनकी मुट्ठीमें है,
उनका नाम सिकंदर

खुदकी कमाई नही है जिसकी,
उसकी झोली खाली
गर्व नहीं है जिसें देशपर,
उसकी राह निराली
हरीभरी इस धरतीमाँको,
और बनाओ सुंदर ।। १।।

साथ हमारे आओ प्यारे,
देखे नये नजारे
भविष्य नीला आसमान,
हम छोटे बडे सितारे
सर है उँचा,पैर है पक्के,
इस मिट्टीके अंदर ।। २।।

अपना सुख देखें लेकीन,
औरोंके घर भी बसाओ
जाति-धरम के नाम पर,
मानवताको न जलाए
परंपरासे गहरा रिश्ता,
नयी दिशाका आदर ।।३।।

## सवयीच्या सुपर हायवेवर

(वेध गीत -२००४)

सवयीच्या सुपर हायवेवर, कधीच नसतात काटे /
नवीन रस्ता शोधत-खोदत माझे "मी" पण भेटे //

नेहमीच्या रस्त्याभोवती थंडगार झाडे
प्रत्येक सिग्नल ओळखीचा, अन् छोटेमोठे खड्डे
पावलोपावली प्रश्न घेऊनी आली नवीन वाट
सुरुंग लावा, डोंगर फोडा जोडा नवीन घाट
श्रमलेल्या रात्रीच्या मुठीत जपले स्वप्न छोटे
नवीन रस्ता शोधत-खोदत माझे "मी" पण भेटे //

तुच्छ टीकेच्या नजरांची, रोज जमावी गर्दी
असह्य व्हावे एकाकीपण, उत्साहाला ओहोटी
अशात यावा हात मदतीचा सूर जमावे छान
पुन्हा अेकदा उंच स्वराने नवीन घ्यावी तान.
मस्तीमध्ये प्रवास सरतो, ध्येय ऊरीचे मोठे
नवीन रस्ता शोधत-खोदत माझे "मी" पण भेटे //

मुक्कामावर वळून पहावे, जमू लागते रांग
वाट आमुची म्हणणाऱ्यांचा, ओघच जणू अथांग
यशकिर्तीच्या शिखरावर, ज्ञानाची दिवली तेवे
अनुभव अपुले दुसऱ्यांसाठी, मुक्तपणे वाटावे.
हसणाऱ्या चेहऱ्यांवर आता आदरकौतुक दाटे
नवीन रस्ता शोधत-खोदत माझे "मी" पण भेटे //

## नवे नवे, मला हवे

(वेध गीत:२००३)

नवे नवे, मला हवे घेऊनि सवे
जुने जुने, ते कालचे रोज आठवे ।।

काल अन् उद्याची भेट आज ही
त्यात विवेकाचे रोप लावू दे ।। धृ ।।

काय जपावे अन् काय सोडू मी ?
कोणते प्रमाण अन् कोणती हमी ?

अनंत शक्यतांची एक जाणीव
शक्ती काय माझ्या काय उणीव
तर्क,ज्ञान, प्रेम ही माझी साधने
मंथनास या जरा दिशा लाभू दे ।।१।।

रंग या जगाचे रोज बदलती
व्यक्ती आणि नाती पक्की कोणती ?

हट्टी विचारांना ठेवू बाजूला
आपल्या सुखाशी, समाज जोडूया
संयमी मनाचे मधुर चांदणे
भविष्य समाधानी त्यात उगवू दे ।।२।।

## झगमगणाऱ्या सुखापलीकडे

(वेध गीत -२००७)

झगमगणाऱ्या सुखापलीकडे
अेक नजर तू टाक रे
मनात लपल्या सवंगड्याची
अैकू येऊ दे हाक रे ।। धृ ।।

अमुचे अंगण वसुंधरा ही
तिच्याभोवती फास रे
हिरवाईची अम्ही लेकरे
कसा गिळावा घास रे ।। १ ।।

माझेमाझे वेचतवेचत
मीच बनवतो कोश रे
विलासात मग विकास हरवे
हीच अटळ खूणगाठ रे ।। २ ।।

भविष्य घडवू समृध्दीचे
संयम त्याचा श्वास रे
स्वार्थ साधूया परमार्थातून
हाच आमुचा ध्यास रे ।। ३ ।।

**वेध गीत २०१०**

कसे टाकू मी पाऊल
रोखतात काटेकुटे
माय वेदनेच्या पोटी
रोप धीराचे रे फुटे
देरे ध्यान गड्या देरे ध्यान। देरे ध्यान गड्या दे रे ध्यान ।।धृ।।

ठेवी हातावर हात
तर दिसे कैची वाट
उडी मारता प्रवाही
कशी चुकवसी लाट
देरे ध्यान गड्या देरे ध्यान। देरे ध्यान गड्या दे रे ध्यान ।।१।।

बळ हवे श्वासामदी
जर सोडायाचा काठ
दिशा नेमकी मिळाली
पडे यशाचीच गाठ
देरे ध्यान गड्या देरे ध्यान। देरे ध्यान गड्या दे रे ध्यान ।।२।।

डोळे मनाचे उघडे
रक्षी विवेकाचे कडे
ऐसे सावध साहस
तंवा इतिहास घडे
देरे ध्यान गड्या देरे ध्यान। देरे ध्यान गड्या दे रे ध्यान ।।३।।

असत्यास भीती नाही
सत्य फिरवते मान
हाती धीराची मशाल
चला उठवू रे रान
देरे ध्यान गड्या देरे ध्यान। देरे ध्यान गड्या दे रे ध्यान ।।४।।

( वेध १९९९: गीत )

**पूरब की तरफ चल,
सूरज की तरफ चल ।
हिंमत को साथ लिये,
सुख की तरफ चल ।।**

**राह में कही-न-कही ,
दर्द भी मिलेगा ।
उसको बाँटने के लिये,
दोस्त भी मिलेगा ।।**

**हँसने के लिये चल,
पढने केलिये चल ।।
किस्मत को हाथ लिये,
कल की तरफ चल ।।१।।**

**आनेवाले कल मे होगा,
खट्टा-मीठापन ।
ज्ञान की प्रकाश में,
उठेगा खिल चमन ।।**

**समता की तरफ चल,
ममता की तरफ चल ।
शांती की आस लिये,
सब की तरफ चल ।। २।।**

## लातूर २०१२ : वेध गीत : लोकल ते ग्लोबल

इवलं इवलं रोप, लई उंच वाढलंय् मोप ।।धृ।।

रोपाचे झाले झाड, फांदीला फुटे डहाळी

पानांनी सजली काया, ती राजस नवी नव्हाळी

हिरव्या गर्दीतून डोकावत, मस्त फुलांच्या रांगा

फुलगुच्छांच्या टोकावर, रसदार फळांच्या जागा।।१।।

सातसमुद्रापल्याडहून विहरत, आला पक्षी प्रवासी

झाडाच्या शेंड्यावर बसुनी, गपशप करतो खासी

येशील का त्या नव्या जगातच, सोडून इथली जागा

तिथेच होईल मोल तुझे, किंमत मग कितीही मागा।।२।।

झाड म्हणे मी उंच वाढलो, इथल्या मातीवरती

इथले पाणी, प्रकाश इथला, खोल मुळांची नाती

फळाफुलांचे वैभव माझे, इथे बालके खाती

सावलीतला थंड विसावा, सानथोरही घेती।।३।।

पराग-केसर देतो तुजला, परदेशात वहाया

रुजतील तेथे आणि डवरतील, देतील फळ अन् छाया

होतील तिथले, तरी न विसरतील ह्या मातीची माया

सत्त्वच माझे मी पाठवले, सर्व जगाला द्याया।।४।।

इवलं इवलं रोप, लई उंच वाढलंय् मोप

**<u>अभ्यासाचा कंटाळा</u>**

**<u>चॅनेल E-10 गीत (१९९८)</u>**

**अभ्यासाचा कंटाळा, अन् झोप येते फार ।**
**कंटाळ्याला सांगू आता, गोष्टी युक्तीच्या चार।।**

**१)भविष्यातली स्वप्ने माझी, करण्याला साकार ।**
**कष्टश्रमाच्या या मार्गाचा, केला मी स्वीकार ।।**

**२)आळसातुनी आळस जन्मे, बोथट बुध्दी पार ।।**
**उद्दीष्टांशी इमान देई, उत्साहाला धार ।।**

**३)क्षणाक्षणाच्या परिश्रमाविना, यश नाही मिळणार।**
**त्याशिवाय मग आनंदाची, गोडी कशी टिकणार।।**

**४)स्फुर्ती गीत हे तुमचे माझे, ओठी आता बसणार।**
**परिक्षेतला अवघड रस्ता, मैत्रीने हसणार ।।**

वेध गीत - कल्याण २०१४

आँखोमें नमीं, ना नजरमें चमक,
सर क्यूं है रे झुका झुका
आँगनमें किरणोंका उत्सव
अंदर तू क्यूं रुका रुका ।।धृ।।
सुबह हो गयी, खुला आसमाँ
क्यूं दोहराए जलवा-सदमा
साँसोमें भर शक्ती-ताजगी
अब न रहो तुम रुखा-सुखा ।।१।।
मनमें है जब उचित भावना
सरल बनाती पढना-लिखना
विकासकी हर राह पुकारे
खुदको मत रख ढका-ढका ।।२।।
आओ बनाए नया कारवाँ
हमभी रचाए अपनी दुनीया
सज रहा सपनोंका ये मेला
फेक दे रंग ये फिका-फिका ।।३।।
आँखोमें हँसी और नजरमें चमक
माथेंपें मंगल टिका-टिका
आँगनमे किरनोंका उत्सव
नाचें डमडम डिका-डिका ।।धृ।।

## वेध गीत २०१२: औरंगाबाद

झोका ग बाई झोका ग
झोका रं बाबा झोका रं।।धृ।।
गेला गेला आभाळात
आला आला भुईवरी
खेळणाऱ्या वाऱ्यासंगे
पावलांची लय सारी।।१।।
दिसामागे रात जाई
सूर्यामागे चंद्र येई
काळ्या दु:खाच्या अंधारी
तेवे सुखाची पुण्याई।।२।।
कधी प्रेमाचा ओलावा
कधी भाकर कोरडी
दाट मायेची सावली
होती, अचानक गेली।।३।।
केव्हा यशाला झळाळी
बाग बहराला येई
अपयशाची काजळी
तिला करपुनी देई।।४।।
हाती आले जे जे कर्म
सुरेख करु हा धर्म
झुला सोडणार नाही
हेच जगण्याचे मर्म।।५।।

## **वेध गीत - कल्याण २०१४**

आँखोमें नमीं, ना नजरमें चमक,
सर क्यूं है रे झुका झुका
आँगनमें किरणोंका उत्सव
अंदर तू क्यूं रुका रुका ।।धृ।।
सुबह हो गयी, खुला आसमाँ
क्यूं दोहराए जलवा-सदमा
साँसोमें भर शक्ती-ताजगी
अब न रहो तुम रुखा-सुखा ।।१।।
मनमें है जब उचित भावना
सरल बनाती पढना-लिखना
विकासकी हर राह पुकारे
खुदको मत रख ढका-ढका ।।२।।
आओ बनाए नया कारवाँ
हमभी रचाए अपनी दुनीया
सज रहा सपनोंका ये मेला
फेक दे रंग ये फिका-फिका ।।३।।
आँखोमें हँसी और नजरमें चमक
माथेंपें मंगल टिका-टिका
आँगनमे किरनोंका उत्सव
नाचें डमडम डिका-डिका ।।धृ।।

## वेध गीत - नाशिक २०१२

अंतरात तेवतसे ध्येयाचा नित्य दिवा
कष्टातूनि उजळू दे, तेजोमय मार्ग नवा।।धृ।।
ज्योत असे एकाकी, साथीला फक्त ध्यास
ह्रदयाच्या तालावर, जागते असीम आस
यश किर्ती धन नलगे, पूर्ती हा विसावा।।१।।
आकाशी दडलेले, स्वप्नांचे साथी
मायेची रेशीमधून घेऊनिया येती
ओंजळीत त्यांच्याही, किरणांचा ठेवा।।२।।
पंखांना बळ येई, मोकळे आभाळ
धुके सरे डोळ्यातील, उभा उषःकाल
ज्ञानकर्मभक्तीपूर्ण, यज्ञ धन्य व्हावा।।३।।

## **पुणे वेध २०१२ गीत**

Career in R & D
संशोधनक्षेत्रातील भविष्यसंधी

अज्ञाताच्या क्षितीजावरती, तेजाची पाऊले
ज्ञानपताका घेऊनी हाती, शोधक हे चालले।।धृ।।
पूर्वसूरींचे वेचुनि अनुभव, प्रयोगक्षमतेचे हो अंगण
वाचन, चिंतन आणि निरीक्षण, अभ्यासाचे सुरेल साधन
समानधर्मी विश्वभरातील एक-सूर उमलले।।१।।
नाकारुनि कळपाचे कुंपण, ऐकति दूर भविष्यातील धून
मानमरातब आणि प्रतिष्ठा, दूर सरकती त्या साऱ्यातून
प्रयत्नातले मंगलगाणे, स्तोत्र तेच आपुले।।२।।
मुक्कामावर पोहोचुनी सारे, निजध्यासी पावले
सत्यभान ते त्यांच्याकरवी विश्वाला लाभले
तन्मयतेचे रहस्य तेव्हा जेथ होतसे खुले।।३।।

वेध गीत - पुणे २०१३

Follow the Dream: **स्वप्नाच्या वाटेवर**

एक सपना, मेरे मनमें
नन्हासा, छा जाता...
साँस मेरी उस सपनेमें
ऐसे घुल मिल जाती...
मेरा जीना, मेरा सपना
एकही हो जाता...
उसके बिना, ये जीना
कैसे बीत जाता...कैसे बीत जाता...कैसे बीत जाता

It's a dream, It's a dream
It's a burning desire
It can spread thru the world
Like a real wildfire
It's a dream, It's a dream

एक सपना अनदेखा
फिरभी इतना अपना...
जिसके लिए हर कोशिश
बस करतेही रहना...
मिले फुँल या कॉटे
आगे चलतेही है रहना...
थकनेसे भी आगे
होगा अपना झरना...होगा अपना झरना...
साथी, कभी न रुकना!
साथी, कभी न रुकना!

It's a dream, It's a dream
It's a burning desire
It can spread thru the world
Like a real wildfire
It's a dream, It's a dream, <u>It's a DREAM!</u>
एक सपना, मेरे मनमें...
नन्हासा छा जाता...

चांदण्याची दिवली लागे, निळ्या आभाळात।
वाऱ्यासंगे उतरली, भुईवर रात।।
मिटलेल्या कळ्यांमागे असे त्याचा हात।
सावलीत अंधाराच्या, लपली पहाट।।
मिटलेल्या डोळ्यांपुढे, दिवसाचा खेळ।
व्यक्ति आणि घटनांचा, बसवूया मेळ।।
उदारता चित्ती ठेवू, टाकुनिया द्वेष।
खुपणाऱ्या भावनांचा, बदलुया वेष।।
विचारांच्या गाण्यामध्ये, घेऊ नवी तान
दिवसाच्या वेलीवर, रोज मऊ पान।।
सारे श्वास नम्र होती, प्रार्थनेची हाक।
त्यातूनच गवसली, देवत्वाची झाक।।

**ठाणे वेध २०१५**

**From Cover to the Core**

बाहरसे सब लागे न्यारा, सुन अंतरके बोल
मितवा मनकी आँखे खोल ।।धृ।।
बाह्य कवच है, अंदर रस है, सृष्टीकी हर चीज
समझ  ले दोनो, एकरुप है, जैसे फलमें बीज
शरीर, मनभी, मिल गये दोनो, बन जाते अनमोल
मितवा मनकी आँखे खोल।।१।।
हर कोई आया, साथमें लाया, नक्शा अपना एक
पहचानो तुम, हर रेखाको, नजर लगाके नेक
ना जाने तो, आनाजाना, बन जाएगा फोल
मितवा मनकी आँखे खोल ।।२।।
तु न अकेला, साथ है तेरे, राही कितने खास
दिखे अलग, लेकीन अंदरकी, जान ले उनकी आँस
इकदुजेके मिलनेसेही, बन गई दुनीया गोल
मितवा, मनकी आँखे खोल ।।३।।